पुनर्सुधारित धामापूर तर्फ संगमेश्वर नळ पाणी पुरवठा योजना. ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१३०८/प्र.क्र.३२३/पापु-०६

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ०१ ऑक्टोंबर २०१३

वाचा -

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.ववेका-१०९८/सीआर-४३०(अ)/पापु-१०, दि.११/३/१९९८

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.ग्रापापु-१३०५/प्र.क्र.१८४/पापु-०६, दि.२४ एप्रिल,२००६

३) अधीक्षक अभियंता (ना व ग्रा) मजीप्रा,ठाणे यांचे पत्र क्र.मजीप्रा ना व ग्रा.यो.मं/ठाणे/तांशा-२/२९५०/२००८, दि.२२/९/२००८

४) कार्यकारी अभियता,म.जी.प्रा.ना. व ग्रा.यो.विभाग,रत्नागिरी यांचे पत्र क्र.मजीप्रानावग्रायोविर/ताशा/१२७४/२०९३,दि.२०/७/२०१३

प्रस्तावना -

धामापूर तर्फ संगमेश्वर नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. ११३.१४ लक्ष (ढोबळ) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास व आराखड्यास संदर्भीय शासन निर्णय क्र.१ अन्वये राज्यातील राज्यस्तरीवरील नळ पाणी पुरवठा योजनास केंद्र पुरस्कृत वर्धित वेग, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम/राज्य शासन पुरस्कृत किमान गरजा कार्यक्रमासाठी प्रशासकीय मान्यता व अनुदान मंजूर करण्यात आली होती. तथापि, काही अपरिहार्य कारणांमुळे योजनेच्या खर्चात वाढ होऊन मूळ योजनेची सुधारित किंमत रु.१२४.३४ (ढोबळ) लक्ष इतकी झाली आहे. या सुधारित किंमतीस दि.२४ एप्रिल, २००६ च्या शासन निर्णयाव्दारे सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. योजनेवर अद्यावत खर्च रु.१२१.४९ लक्ष झाला असून अपेक्षित वाढ खर्च रु.१०.६६ लक्ष इतका आहे. या वाढीव खर्चामुळे या सुधारित योजनेची पुनर्सुधारित किंमत रु.१३५ लक्ष (रुपये एकशे पस्तीस लक्ष फक्त) इतकी झाली आहे. या योजनेचा खर्च मान्य करण्यात आला असून सदर प्रस्तावास दि.२६ सप्टेंबर,२००८ रोजी राज्यस्तरीय छोट्या गटाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. मूळ योजनेमध्ये भाववाढीची तरतूद नसल्यामुळे व कंत्राटदारास भाववाढ देय असल्याने द्यावी लागणाऱ्या रकमेमुळे योजनेच्या खर्चात वाढ झालेली आहे. योजनेची सर्व कामे पूर्ण करुन योजना ग्रामपंचायतीस हस्तांतर करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने अधिक्षक अभियंता (ना व ग्रा) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे व कार्यकारी अभियंता (नागरी व ग्रामीण), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, रत्नागिरी यांचेकडून प्राप्त झालेल्या संदर्भीय क्र.३ व ४ नुसार उक्त पाणी पुरवठा

योजनेच्या सुधारित अंदाजपत्रकास व आराखड्यास पुनर्सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय –

वरील प्रस्तावनेच्या अनुषंगाने पुनर्सुधारित धामापूर तर्फ संगमेश्वर नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. १३५.०० लक्ष (रुपये एकशे पस्तीस लक्ष फक्त) इतक्या किंमतीच्या पुर्नसुधारित अंदाजपत्रकास व आराखड्यास खालील अटींच्या अधीन राहून पुनर्सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कार्यान्वीत करण्यात येईल.

२) या योजनेला प्रशासकीय मंजूरी दिलेल्या संदर्भाधिन क्र.१ व २ नुसार शासन निर्णयात ज्या सूचना/अटी व शर्ती दिलेल्या आहेत त्या कायम असून, त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

३) सदर योजना पूर्ण झाल्यावर ती संबंधित ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात यावी. संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना विभाग, रत्नागिरी यांच्याकडून योजना प्रत्यक्षात पूर्ण झाली आहे, या आशयाची सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत योजना ताब्यात घेण्यासंबंधी ग्रामपंचायत/जिल्हा परिषद जबाबदार राहील. योजना प्रत्यक्षात पूर्ण झाल्यावर लगेच संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना विभाग, रत्नागिरी व संबंधित जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी आयोजित करावी आणि अशा पाहणीत कोणतेही दोष आढळून आल्यास योजना ताब्यात देण्यापूर्वी ते सुधारण्यात यावेत.

४) सदर योजना राबविणे, त्याचे परिरक्षण दुरुस्त्या (विशेष दुरुस्त्या धरुन) यावर दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, घसारा किंवा यंत्रसामुग्रीचे नुतनीकरण निधीसाठी किंवा योजनेच्या खर्चातील लाभ घेण्याचा हिस्सा सोसण्यासाठी येईल त्या खर्चापोटी ग्रामपंचायतीस/जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणतेही शासकीय अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

५) महाराष्ट्र ग्रामपंचायत कर/फी नियम,१९६० मधील तरतूदीनुसार आकारण्यात येणाऱ्या पाणीपट्टीच्या आधारे योजना स्वावलंबी ठरेल हे पाहण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेची राहील. योजना स्वयंनिर्भर होण्यासाठी आवश्यक पाणीपट्टी बसविणे व त्यात वाढ करणे बंधनकारक राहील. त्याअनुषंगाने या योजनेकरीता जिल्हा परिषद पाणीपट्टी आकारेल. जिल्हा परिषदेने तशा आशयाचा ठराव केल्याशिवाय योजनेची कामे हाती घेऊ नयेत.

६) गावातील अवैध नळजोडण्या शोधून त्या नियमित करणे तसेच अस्तित्वातील नळ खांब्यांचे गट जोडण्यासाठी रुपांतरण करावे.

७) ठोक पाणी पुरवठ्याचे मोजमाप होण्यासाठी जलकुंभानजिक जलमापके बसविणेत यावी.

८) पाण्याचे देयके व वसुलीची १००% व्यवस्था निर्माण करावी.

३. या योजनेवर होणारा खर्च (मागणी क्र.वाय-२), २२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता- ०१-पाणी पुरवठा-१०२-ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम-(बी) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने- ४१-सहाय्यक अनुदान (एक) (डब्ल्यूएस-६) (राज्यक्षेत्र) या पाणी पुरवठा योजनांसाठी ग्रामपंचायती/ जिल्हा परिषदांना अनुदाने (२२१५ १२१७) या अर्थसंकल्पीय शिर्षाखाली नोंदवावा व त्या अर्थशिर्षाखाली केलेल्या उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-१०००/प्र.क्र.४६/२००१/ विनियम, दि.११.७.२००१ मधील उपविभाग-३ मधील अ.क्र.६ समोरील परिच्छेद क्र.२७(अ) अनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१००१११५६५८५१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PATIL
DEELIP P

Digitally signed by PATIL DEELIP P
DN: c=IN, o=Govt Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation, postalCode=400001, st=: Maharashtra, cn=PATIL DEELIP P
Date: 2013.10.01 12:12:52 +05'30'

(दिलीप पाटील)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१
२. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई,
३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
४. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
५. जिल्हाधिकारी, रत्नागिरी
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी
७. मुख्य अभियंता (नागरी व ग्रामीण),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
८. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे/नवी मुंबई
९. अधीक्षक अभियंता (नागरी व ग्रामीण), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे
१०. संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पी.एम.टी.बिल्डींग, स्वारगेट, पुणे
११. उपसंचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, रत्नागिरी
१२. वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, रत्नागिरी
१३. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, रत्नागिरी
१४. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी

१५. ग्रंथपाल, ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (२ प्रती)
१६. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१७. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१८. प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
१९. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. कार्यासन पापु-०४, ०५, ०९, १३, १७, १८, संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. निवडनस्ती (कार्यासन पापु-०६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १३०८/प्र.क्र.३२३/पापु-०६,
दि.०१ ऑक्टोबर २०१३ चे सहपत्र.

योजनेचे नांव	योजनेची मुळ मंजूर किंमत			योजनेची सुधारित किंमत			योजनेची पुनर्सुधारित किंमत		
	वर्धित वेग कार्यक्रम अंतर्गत मंजूर तरतूद	किमान गरजा कार्यक्रम अंतर्गत मंजूर तरतूद	एकूण	वर्धित वेग कार्यक्रम अंतर्गत मंजूर तरतूद	महाजल कार्यक्रम अंतर्गत मंजूर तरतूद	एकूण	वर्धित वेग कार्यक्रम अंतर्गत मंजूर तरतूद	महाजल कार्यक्रम अंतर्गत मंजूर तरतूद	एकूण
१	२	३	४	५	६	७	८	९	
पुनर्सुधारित धामापूर तर्फ संगमेश्वर नळ पाणी पुरवठा योजना. ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी	८८.३१	२४.८३	११३.१४	८८.३१	३६.०३	१२४.३४	८८.३१	४६.६९	१३५.००

PATIL DEELIP P

Digitally signed by PATIL DEELIP P
DN: c=IN, o=Govt Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation, postalCode=400001, st=: Maharashtra, cn=PATIL DEELIP P
Date: 2013.10.01 12:13:20 +05'30'

(दिलीप पाटील)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन.